गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक २९१ वा | मंगळवार १२ मार्च २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 291 | Date : 12/03/2024 blow Tuesday Page 4 Price 4

## भारत जोडो न्याय यात्रा आज महाराष्ट्रात येणार

तापी : गुजरातमधील 'भारत जोडो न्याय यात्रे'च्या अखेरच्या टप्प्यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी रविवारी सुरत जिल्ह्यातील 'स्वराज आश्रमा'ला भेट दिली. यावेळी त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल




यांच्या स्मृतींना आदरांजली वाहून अभिवादन केले. चार दिवसांत गुजरातमधील सात जिल्ह्यांतून या यात्रेच्या गुजरातमधील टप्प्याचा समारोप झाला. राहुल गांधींनी रविवारी सुरत जिल्ह्यातील बारडोली येथील 'स्वराज आश्रमा'ला भेट देऊन सरदार वल्लभभाई पटेल यांना आदरांजली अर्पण केली. १२ मार्च रोजी दुपारी दोनला महाराष्ट्रात प्रवेश करेल. नंदुरबार जिल्ह्यातून जिथे आदिवासी संमेलन आयोजित केले आहे. त्याद्वारे या यात्रेला पुन्हा सुरुवात होईल.

राजस्थानमधील काँग्रेसचे माजी मंत्री राजेंद्र यादव आणि लालचंद कटारिया यांच्यासह अनेक नेत्यांनी रविवारी भाजपमध्ये प्रवेश केला. त्याबरोबर काँग्रेसचे माजी आमदार रिचपाल मिर्धा, विजयपाल मिर्धा आणि खिलाडी बैरवा, माजी अपक्ष आमदार आलोक बेनिवालस यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला.

हरियाणामधील भाजपचे खासदार ब्रिजेंद्र सिंह यांनी रविवारी पक्षाचा राजीनामा देऊन काँग्रेसमध्ये प्रवेश केला. अपरिहार्य राजकीय कारणांमुळे भाजप सोडत असल्याचे त्यांनी सांगितले. राजीनाम्याची घोषणा केल्यानंतर सिंह यांनी नवी दिल्लीमध्ये काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली आणि काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

# केंद्र सरकारकडून 'सीएए' कायद्याची अधिसूचना जारी

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : नागरिकत्व सुधारणा कायदा म्हणजेच सीएए बाबत मोठी बातमी समोर आली आहे. केंद्र सरकारकडून 'सीएए' कायद्याची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. केंद्रीय गृह मंत्रालय आज (दि.११) नागरिकत्व सुधारणा कायद्याचे ('सीएए') नियम अधिसूचित केले आहेत. पीएम मोदी आणि गृहमंत्री अमित शाह २०१९ पासून सीएए लागू करण्यासाठी आग्रही भूमिका मांडत आले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी १० फेब्रुवारी रोजी नागरिकत्व दुरुस्ती कायद्याबाबत ('सीएए') मोठी घोषणा केली होती. दरम्यान, आता सीएएच्या अंमलबजावणीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.



लोकसभा निवडणुकीआधी (Lok Sabha Elections 2024) देशात सीएए कायदा (CAA Law) लागू करणार असल्याचे शाह म्हणाले होते. त्यानंतर आता गृहमंत्रालय ॲक्शन मोडवर आले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सीएएचे नियम लागू करण्यासाठी अंतिम प्रक्रिया सुरु आहे. काही आठवड्यांपूर्वीच केंद्रीय गृहमंत्रालयाने यासाठी या कायद्याचे नियम बनवण्यासाठी एक समिती बनवली होती. नागरिकत्व सुधारणा विधेयक ११ डिसेंबर २०१९ मध्ये संसदेत पारित करण्यात आले होते. त्यानंतर एका दिवसात राष्ट्रपतींनी या विधेयकावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या. सीएएच्या कायद्यामुळे, पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानतून आलेल्या हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारसी आणि ख्रिश्र्चन समुदायातील अल्पसंख्याकांना भारताचे नागरिकत्व देण्यासाठी मदत होणार आहे.

सीएएचा कायदा कोणत्याही व्यक्तीला स्वत:हून नागरिकत्व बहाल करत नाही. हा कायदा ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत किंवा त्यापूर्वी पाकिस्तान, भारत आणि बांगलादेशातून भारतात आले आहेत. अशा लोकांसाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. पाकिस्तान आणि बांगला देशातील शरणार्थींना नागरिकत्व बहाल करण्याच्या दृष्टीने हा कायदा बनवण्यात आलाय. पाकिस्तान आणि बांगला देशमध्ये हिंदूंचा छळ होतो, ते लोक भारतात शरणार्थी म्हणून येत असतात, त्यांना आपल्याला नागरिकत्व बहाल करायचे आहे, असे गृहमंत्री अमित शाह यांनी स्पष्ट केले होते. भारताचे नागरिकत्व मिळवण्यासाठी शरणार्थींना त्यांच्या देशात धार्मिक अत्याचाराला सामोरे जावे लागत असल्याचे पुराव्यानिशी सिद्ध करावे लागणार आहे. याबाबत संविधानाच्या आठव्या सूचीत महत्वपूर्ण तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

## अपारंपरिक, नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी क्षेत्रातील मोठ्या प्रकल्पांचे शुभारंभ व भूमिपूजन

मुंबई : राज्यात नाविन्यपूर्ण प्रकल्पांवर भर देण्यात येत आहे. अपारंपरिक व नविनीकरणीय ऊर्जा स्रोतांतील सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, ग्रीन हायड्रोजन या पर्यायांवर अंमलबजावणी केली जात आहे. ग्रीन हायड्रोजनचा वापरास प्रोत्साहन देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित अंतर्गत महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) सहयोगी कंपनीच्या वतीने विविध जिल्ह्यातील ५ भव्य प्रकल्पांचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आज शुभारंभ व भूमिपूजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री श्री शिंदे बोलत होते. मुंबई मधील सह्याद्री अतिथीगृह येथे



आज कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमात महाप्रितने बृहमुंबई महानगरपालिकेच्या सहयोगाने फ्लोटिंग सोलार अडीच हजार मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठीचा सामंजस्य करार, मुख्यमंत्री सौर उद्योग उत्थान प्रकल्प (एम.एस.एम.इ) अंतर्गत ४०० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पाचा शुभारंभ, ठाणे जिल्ह्यातील दुधनी- वापे येथे कार्बन न्यूट्रल प्रकल्पाचे भूमीपूजन, सातारा जिल्ह्यातील मोळ या ठिकाणी १०० मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्पाचे भूमीपूजन, रत्नागिरी रेल्वे स्थानक येथे एकात्मिक । पान २ वर

## इस्रोपाठोपाठ डीआरडीओच्या वैज्ञानिकांचा डंका; 'दिव्यास्त्र' मोहीम यशस्वी, पंतप्रधानांकडून शाबासकी

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (११ मार्च) सायंकाळी भारतीयांना एक शुभवार्ता दिली. डीआरडीओच्या (संरक्षण, संशोधन आणि विकास संस्था) वेज्ञानिकांनी हाती घेतलेली दिव्यास्त्र मोहीम यशस्वी केली आहे. याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डीआरडीओच्या






शास्त्रज्ञांचं कौतुक केलं आहे. मोदी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की, मल्टीपल इंडिपेंडन्टली टार्गेटेबल री-एंट्री व्हीकल (एमआयआरव्ही) तंत्रज्ञानासह पूर्णपणे स्वदेशी बनावटीचं अग्नी-५ या क्षेपणास्त्राची पहिली चाचणी यशस्वी झाली आहे. मिशन दिव्यास्त्राच्या यशामुळे आम्हाला आमच्या डीआरडीओमधील वैज्ञानिकांचा अभिमान वाटतो. डीआरडीओने २०२२ मध्येदेखील भारताच्या शक्तीशाली क्षेपणास्त्रांची चाचणी केली होती. तेव्हा या क्षेपणास्त्रांनी ५,५०० किमी दूरपर्यंतचं लक्ष्य यशस्वीपणे उध्वस्त केलं होतं. हे क्षेपणास्त्र डीआरडीओ आणि भारत डायनॅमिक्स लिमिटेडने संयुक्तपणे विकसित केलं आहे. या क्षेपणास्त्रामुळे पाकिस्तान आणि चीनसारख्या देशांची संपूर्ण भूमी भारताच्या रडारवर । पान २ वर

## पुस्तकांने मन आणि मस्तकासह पुढच्या पिढ्याही सुधारतात : ग्रंथालय संघाचे पुणे विभागीय अध्यक्ष विजय कोलते

सोलापूर/प्रतिनिधीः पुस्तकांने मन आणि मस्तकासह पुढच्या पिढ्याही सुधारत असल्याने वाचन चळवळ घराघरापर्यंत पोहचविणे गरजेचे असल्याचे मत ग्रंथालय संघाचे पुणे विभागीय अध्यक्ष विजय कोलते यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून व्यक्त केले.उच्च व तंत्रशिक्षण, ग्रंथालय संचालनालय, जिल्हा ग्रंथालय अधिकार कार्यालय, सोलापूर व दयानंद शिक्षण संस्था, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या सोलापूर ग्रंथोत्सव २०२३ कार्यक्रमाप्रसंगी कोलते हे बोलत होते.

प्रारंभी सकाळी दयानंद काशीराम आसावा प्रशाला येथून मुख्याध्यापक जितेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथदिंडीस सुरुवात करण्यात आली. या ग्रंथदिंडीत दयानंद काशीराम आसावा प्रशाला, हंचाटे विद्यालय, ज्ञानसंपदा प्रशाला, सोलापूर लाटी काटी असोसिएशन व वारकरी मंडळ यांनी सहभाग घेतला होता. यावेळी मुला-मुलींनी लेझीम, लाटीकाटी, ढोल पथकांनी आपापले खेळ साधर करून जाणाऱ्या येणाऱ्यांची नजर वळवून घेत होते.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली महाराष्ट्र गीत व स्वामी रंगनाथन यांच्या प्रतिमेपूजन आणि दीप प्रज्वलनाने सुरुवात झाली.पुढे बोलताना कोलते म्हणाले की, सुजाण समाज घडविण्यासाठी वाचन चळवळ तळागाळापर्यंत पोहोचली पाहीजे त्यासाठीच ग्रंथालय सक्षम करण गरजेच आहे.माध्यमिकचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप आपल्या उद्धाटनपर भाषणात म्हाणाले की, विद्यार्थी ज्ञानपूर्ण व सक्षम करावयाचा असेल तर ग्रंथालय चळवळ व शाळांमध्ये चांगला समन्वय साधला पाहीजे. त्यासाठी आपण लवकरच ग्रंथालय चळवळीतील व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची । पान २ वर

## पर्यायी बाजार व्यवस्था, कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या अभ्यासासाठी गठीत दांगट समितीचा अहवाल शासनास सादर

मुंबई : राज्यातील पर्यायी बाजार व्यवस्था तसचे कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा अभ्यास करण्यासाठी गठीत केलेल्या माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट अभ्यासगटाच्या शिफारशी शासनास सादर करण्यात आल्या. सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पणन मंत्री अब्दुल सत्तार, कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह मंत्री मंडळातील अन्य मंत्री यांच्या उपस्थितीत माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट यांनी अभ्यास गटांच्या शिफारशी शासनास सादर केल्या. खाजगी बाजार, थेट पणन परवाना, शेतकरी ग्राहक-बाजार, ई-व्यापार व्यासपीठ (e-Trading Platform) तयार करणे. कंत्राटी शेती, कृषी उत्पन्न बाजार समित्या, खासगी बाजार व कृषी उत्पन्न बाजार समिती यांचा तुलनात्मक अभ्यासातील

महत्वाच्या बाबी, किमान आधारभूत किंमतीबाबत, कृषी पणन विभागाचे बळकटीकरण आणि पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करणे. कृषी पणन व्यवस्थेत भविष्याचा वेध घेणे. या महत्त्वाच्या शिफारशी शेतकरी हित केंद्रबिंदू मानून अभ्यासगटांने सादर केल्या आहेत.

## अवघ्या २४ तासात भाजपचे दोन खासदार काँग्रेसच्या गळाला! लोकसभा निवडणुकीपूर्वीच तगडा झटका

जयपूर/नवी दिल्लीः चुरूचे भाजप खासदार राहुल कासवान यांनी आज (११ मार्च) भाजपला रामराम करत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या उपस्थितीत त्यांनी प्रवेश केला. माजी केंद्रीय मंत्री चौधरी बिरेंदर सिंह यांचा मुलगा हिसारचे भाजप खासदार ब्रिजेंद्र सिंह यांनी सुद्धा रविवारी भाजपमधून राजीनामा दिला. बिजेंद्र सिंह यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे अवघ्या २४ तासात भाजपला तगड झटका बसला आहे. यापूर्वी दिल्लीतील दोन भाजप खासदारांनी राजकाणालाच रामराम केला आहे. काँग्रेसमध्ये सामील झाल्यानंतर, आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने तिकीट नाकारलेले कासवान म्हणाले की, त्यांना पक्षात आवाज ऐकला जात नाही, असे वाटले. सत्तेच्या विरोधात लढलेल्या अशा लोकांची पक्षाला गरज आहे, असे सांगत खरगे यांनी काँग्रेसमध्ये त्यांचे स्वागत केले. राहुल कासवान काँग्रेसमध्ये सामील



झाल्याबद्दल मी मनापासून स्वागत करतो. सरंजामी लोकांविरुद्ध लढणारे आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाला पाठिंबा देणारे राहुल कासवानकाँग्रेस पक्षात सामील झाले याचा मला आनंद झाल्याचे खरगे म्हणाले.

दुसरीकडे, भाजपचे हरियाणातील लोकसभा खासदार ब्रिजेंद्र सिंह यांनीही रामराम केला आहे. त्यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची भेट घेऊन काँग्रेसमध्ये प्रवेश केला. प्रसारमाध्यमांच्या प्रश्नांना उत्तर देताना ब्रिजेंद्र सिंह म्हणाले की, दोन ऑक्टोबर रोजी जींदच्या रॅलीत। पान २ वर

## पर्यावरण संवर्धनासाठी बांबू लागवड उपयुक्त : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### बांबू लागवड, उत्पादन व संवर्धनासाठी मोबाईल जनजागृतीचे लोकार्पण

मुंबई : गेल्या काही वर्षांत वातावरणात बदल झाले आहेत. त्याचे विपरित परिणाम म्हणून ग्लोबल वॉर्मिंग, अवकाळी पाऊस, गारपीट, अशी संकटे येत आहेत. या पार्श्र्वभूमीवर पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणासाठी बांबू लागवड उपयुक्त ठरणार आहे. त्यासाठी मोबाईल जनजागृती व्हॅन अर्थात प्राणवायू रथाच्या माध्यमातून शेतकरी, नागरिकांमध्ये जनजागृती होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने फिनिक्स फाऊंडेशन, लातूर यांच्या सहयोगाने बांबू लागवड, उत्पादन व संवर्धन मोबाईल जनजागृती व्हॅन अर्थात प्राणवायू रथाचा लोकार्पण सोहळा आज दुपारी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते वर्षा या शासकीय निवासस्थानी आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे, सहसंचालक डॉ. व्ही. एम. मोटघरे उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, बांबूची शेती पर्यावरण संवर्धनासाठी महत्वपूर्ण आहे. बांबूपासून विविध उत्पादने मिळतात. बांबूपासून अधिकचा ऑक्सिजन मिळतो. तसेच त्याचे कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेण्याचे प्रमाण अधिक आहे. बांबू लागवडीचे प्रमाण वाढून पर्यावरणाच्या रक्षणासाठी शेतकरी, नागरिकांमध्ये जनजागृतीसाठी प्राणवायू मोबाईल व्हॅन उपयुक्त ठरेल. महामार्गांच्या दोन्ही बाजूला बांबूची लागवड करण्यात यावी, अशाही सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिल्या.

मुंबई शहरात प्रदूषण नियंत्रणासाठी डीप क्लिनिंग मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच मुंबई शहरात रेसकोर्स परिसरात ३०० एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे मुंबई पार्क उभारण्यात येईल. तसेच विकास प्रकल्पांची उभारणी करताना ते पर्यावरण पूरक राहतील याचीही दक्षता घेण्यात आल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. यावेळी प्राणवायू रथाची सविस्तर




माहिती देण्यात आली. तसेच बांबूच्या आर्थिक, पर्यावरणीय मूल्याबद्दल जागरूकता वाढविणे आणि बांबू लागवडीला प्रोत्साहन देणे आहे. हा प्रकल्प लहान व अल्प भूधारक शेतकऱ्यांमध्ये बांबू लागवडीला चालना देत स्थिर, सातत्यपूर्ण आणि शाश्र्वत उत्पन्नाचा स्त्रोत प्रदान करेल, असेही यावेळी सांगण्यात आले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय

### न्यायालयाचा निर्णय...

पैसे घेऊन मत देणाऱ्या आमदार, खासदारांना सर्वोच्च न्यायालयाने सणसणीत चपराक हाणली असून लोकशाही प्रणालीवर विश्वास ठेवणाऱ्या भारतातील प्रत्येक नागरिकाकडून न्यायालयाने 'नोट फॉर वोट' संदर्भात दिलेल्या निकालाचे मनापासून स्वागत झाले आहे. २६ वर्षांपूर्वी आपलाच निर्णय न्यायालयाने रद्द करून नव्याने दिलेला निर्णय दिलासा ेणारा ठरला आहे. मतदान करण्यासाठी किंवा सभागृहात भाषण करण्यासाठी लाच घेणारे खासदार, आमदार आता पैसारूपी लाच घेताना शंभरदा विचार करतील. २०१२ मध्ये झालेल्या राज्यसभा निवडणुकीच्या वेळी झारखंड मुक्ती मोर्चाचे प्रमुख शिबू सोरेन यांची सून आणि पक्षाच्या (झामुमो) आमदार सीता सोरेन यांनी एका अपक्ष उमेदवाराकडून मतासाठी लाच स्वीकारल्याचा आरोप झाला होता. हा आरोप रद्द करण्यासाठी त्यांनी झारखंड उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र, १७ फेब्रुवारी २०१४ मध्ये न्यायालयाने ही याचिका फेटाळली. त्यामुळे सोरेने यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. यासाठी त्यांनी १९९८ च्या निकालानुसार आपले सासरे शिबू सोरेन यांना मिळालेले संरक्षण आपल्यालाही मिळावे, अशी मागणी याचिकेत केली. ही याचिका २०१९ मध्ये तत्कालीन सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्यासमोर सुनावणीस आली. पुढे २० सप्टेंबर २०२३ रोजी १९९८ च्या निकालाचा फेरविचार करण्यास मान्यता देण्यात आली. हा निकालच सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय खंडपीठाने अलीकडे रद्दबातल ठरवला आहे. राजकारणातील 'पेटी' हा शब्द जाऊन त्याची जागा 'खोक्या'ने घेतली आहे. यावरून राजकारणात पैशांची किती प्रचंड उलाढाल होत असेल याचे गणित मांडणे सामान्यजनांच्या आकलनापलीकडील आहे. कार्यकर्ते, नेते विकत घेण्यासाठी एक दर, तर आमदार, खासदार फोडण्यासाठी दुसरा दर असा पैशांचा खेळ चालतो. सरकार पाडायचे असेल तर त्यासाठी ओतण्यात येणारा पैसा डोळे विस्फारायला लावणारा असतो. याच पैशातून अनेकांची संस्थाने थाटली गेली आहेत. काही वर्षांपूर्वी राजकारणातील गुन्हेगारीचे उच्चाटन करण्यासाठी न्यायालयांनी पुढाकार घेतला. कितीही अरेरावी केली तरी न्यायालयाचा अशी अरेरावी करणाऱ्यांवर धाक असल्याने गुन्हेगारीचे काही प्रमाणात उच्चाटन झाले.परंतु, त्याला अद्याप पाहिजे तसे यश आलेले नाही. आपल्याकडे लोकप्रतिनिधींच्या लाचखोरी प्रकरणांच्या तपासाचे पुढे काय होते हेच कधी समोर येत नाही. त्यामुळे तपास यंत्रणांच्या तपासात पारदर्शकता आली पाहिजे. लोकशाहीच्या रक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय फार महत्त्वाचा आहे.

## मुंबईकरांचा प्रवास सुखकर करणारा सागरी किनारा मार्ग

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मुंबई शहरातील धकाधकीच्या जीवनात वेळ आणि इंधन बचतीला आत्यंतिक महत्त्व आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या सागरी किनारा मार्ग (दक्षिण) ची एक बाजू वाहतुकीसाठी खुली होत असून वेळ आणि इंधन बचतीबरोबरच वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुखकर करण्यामध्ये हा मार्ग महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळख असलेले मुंबई हे भारतातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे एक प्रमुख शहर आहे. दक्षिण मुंबईतील परिसर व्यापार उदिमाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जातो. सात बेटांनी तयार झालेल्या मुंबईचा भौगोलिक विस्तार उत्तर दक्षिण असा पसरलेला असल्याने येथील देशाच्या मुख्य भागाशी जोडलेले दोन मुख्य रस्ते देखील उत्तर दक्षिण असेच बांधलेले होते. साहजिकच या रस्त्यांवर वाहतूक कोंडी ही नित्याची बाब असे. तथापि मागील काही वर्षांत या रस्त्यांना पूरक असे नवीन रस्ते तयार होत असल्याने रहदारीची ही जटील समस्या कमी होऊ लागली आहे. नुकत्याच सुरू झालेल्या 'अटल सेतू' नंतर आता सोमवारी वाहतुकीसाठी खुला होत असलेला मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.



**प्रकल्पामुळे होणारे फायदे** सागरी किनारी रस्त्यामुळे अंदाजे ७० टक्के वेळेची बचत होणार असून इंधनामध्ये ३४ टक्के बचत होईल. इंधन बचतीमुळे प्रती वर्षी विदेशी चलनाची देखील मोठ्या प्रमाणात बचत होईल. ध्वनी आणि वायू प्रदूषण कमी होईल. सुमारे ७० हेक्टर हरितक्षेत्र निर्मितीमुळे प्रदूषण कमी होण्यास मदत होऊन मुंबईकरांचे जीवनमान सुधारेल. या हरितक्षेत्रात सायकल ट्रॅक, सार्वजनिक उद्याने, जॉगिंग ट्रॅक, खुले प्रेक्षागृह आदी प्रस्तावित आहेत. या रस्त्यामुळे इतर मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल आणि सुरक्षित व जलद प्रवास करता येईल. मुंबईकरांना सागर किनारी अतिरिक्त प्रोमीनेड उपलब्ध होईल.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये** मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) हा दक्षिण मुंबईतील प्रिन्सेस स्ट्रीट फ्लायओव्हर ते वांद्रे वरळी सी लिंकच्या वरळी टोकापर्यंत असणार आहे. या रस्त्याची लांबी १०.५८ कि.मी. असून मार्गिकांची रस्त्यावरील संख्या दोन्ही बाजूला प्रत्येकी चार असेल. तर बोगद्यांमध्ये ती दोन्ही बाजूला प्रत्येकी तीन असेल. भराव टाकून बनविलेल्या रस्त्यांची लांबी ४.३५ कि.मी. असून पुलांची एकूण लांबी २.१९ कि.मी.आहे. या मार्गातील मलबार हिल टेकडीच्या खालील दुहेरी बोगद्यांची लांबी प्रत्येकी २.०७२ कि.मी. असून त्याचा अंतर्गत व्यास ११ मीटर आहे. याचे एकूण भरावक्षेत्र १११ हेक्टर इतके असून तीन ठिकाणी आंतरबदल असतील ज्यांची लांबी १५.६६ कि.मी. इतकी आहे. ७.५ कि.मी. लांबीचे नवीन पदपथ असून बस वाहतूकीसाठी समर्पित मार्गिका ठेवण्यात आली आहे. समुद्री लाटांपासून बचावासाठी ७.४७ कि.मी. लांबीची सागरी तटरक्षक भिंत असणार आहे. या प्रकल्पात अमरसन्स, हाजी अली, वरळी डेअरी, थडाणी जंक्शन, वरळी येथे पार्किंगची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. हा प्रकल्प मे २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून २५ फेब्रुवारी पर्यंत याची भौतिक प्रगती ८५.९१ टक्के तर आर्थिक प्रगती ८१.१९ टक्के इतकी झाली आहे. बोगदा खणन काम १०० टक्के पूर्ण झाले असून पुनःप्रापणाचे (रिक्लेमेशन) चे काम ९८ टक्के पूर्ण झाले आहे. समुद्रभिंत उभारण्याचे काम देखील पूर्णत्वास आले असून आंतरबदल ८७ टक्के तर पुलांचे काम ८५ टक्के पूर्ण झाले आहे.

**बोगद्याची वैशिष्ट्ये** किनारा मार्गावरील पहिला बोगदा खणण्याची सुरुवात जानेवारी २०२१ मध्ये करण्यात आली होती. हा बोगदा जानेवारी २०२२ मध्ये पूर्ण झाला. दुसरा बोगदा खणण्याची सुरुवात एप्रिल २०२२ मध्ये करण्यात आली आणि हा बोगदा मे २०२३ मध्ये पूर्ण झाला. बोगद्याला ३७५ मि.मी. जाडीचे काँक्रीटचे अस्तर लावण्यात आलेले असून त्यावर अग्नीप्रतिबंधक उपाययोजनेअंतर्गत अग्नीरोधक फायरबोर्ड लावण्यात येत आहेत. भारतात प्रथमच सकार्डो वायुविजन प्रणालीची व्यवस्था करण्यात आली असून आपत्कालिन निर्वासनासाठी प्रत्येक ३०० मीटरवर छेद बोगदे आहेत. उपयोगिता सेवेसाठी बोगद्यांमध्ये युटीलिटी बॉक्सची व्यवस्था करण्यात आली आहे. दुहेरी बोगद्यासाठी अद्ययावत वाहतूक व्यवस्थापन नियंत्रण प्रणालीची व्यवस्था करण्यात येत आहे.

**प्रकल्पाचा खर्च** मुंबई किनारी रस्त्यासाठी एकूण बांधकाम खर्च १३९८३.८३ कोटी रुपये अपेक्षित आहे. यामध्ये ९३८३.७४ कोटी रुपयांच्या प्रत्यक्ष बांधकाम खर्चाबरोबरच इतर अनुषंगिक खर्चाचा समावेश आहे.

**इतर वैशिष्ट्ये** सागरी रस्ता प्रकल्पातील बोगदा खणणाऱ्या यंत्राने (टीबीएम) खोदण्यात येणारा भारतातील सर्वात मोठ्या व्यासाचा बोगदा (व्यास १२.१९ मी.) आहे. भारतात प्रथमच रस्ते वाहतूक बोगद्यामध्ये सकार्डो वायुविजन प्रणालीची योजना करण्यात आली आहे. तसेच भारतामध्ये प्रथमच एकलस्तंभ पाईलचा पाया बांधून पुलांची उभारणी करण्यात आली आहे. एकाच प्रकल्पामध्ये पुनःप्रापण करुन रस्ता, पूल, उन्नत मार्ग, उतरण मार्ग, आच्छादित बोगदा, समुद्र तसेच टेकडीखालून बोगदा, हरितक्षेत्राची निर्मिती करण्यात आली आहे. प्रकल्पातील प्रवाळांचे (कोरल) स्थलांतर व अस्तित्व टिकविण्याचे काम यशस्वीरित्या साध्य करण्यात आले आहे.

एकूणच वेळ आणि इंधन बचतीबरोबरच वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी करून मुंबईकरांचे दैनंदिन जीवनमान सुखकर करण्यामध्ये हा किनारा मार्ग महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, हे निश्र्चित.**ब्रिजकिशोर झंवर, विभागीय संपर्क अधिकारी**

पान १ वरुन

### अपारंपरिक, नविनीकरणीय ऊर्जा ..

शितगृह प्रकल्पाचे भूमीपूजन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील व कोकण रेल्वेचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक संतोष झा हे व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे तसेच मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त इकबालसिंह चहल, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे, महाप्रित व महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.अमोल शिंदे कार्यक्रमस्थळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, तीन वर्षांपासून महाप्रितने महामंडळाची सहयोगी कंपनी म्हणून काम करताना उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. राज्य सरकारने ग्लोबल वार्मिंग व क्लायमेट चेंजसाठी लढताना ऊर्जा क्षेत्रात अपारंपरिक स्रोतांतून वीज निर्मिती करण्यास प्राधान्य दिले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील विकासाची गती वाढविली आहे. यासाठी महाराष्ट्रात नाविन्यपूर्ण काम केले जात आहे.

ते म्हणाले की, उद्योगांच्या गुंतवणुकीसाठी उद्योगस्नेही धोरण, रेड कार्पेट, सिंगल विंडो सिस्टिम, सबसिडी व विविध उपायांमुळे महाराष्ट्र हे औद्योगिक गुंतवणूकदारांसाठी पसंतीचे राज्य ठरले आहे. दावोस येथे विदेशी गुंतवणुकीसाठी झालेल्या सामंजस्य करारांपैकी ७३ हजार कोटी गुंतवणूक प्रत्यक्षात कार्यवाही होत आहे. राज्यातील युवकांच्या कौशल्य विकासासाठी मोठे काम होत आहे. गडचिरोली सारख्या जिल्ह्यात टाटा कन्सल्टन्सीच्या सहकार्याने ५ हजार उमेदवारांना प्रशिक्षण देता येईल, असे केंद्र स्थापन करण्यात येत असून यामुळे तेथील युवकांना रोजगार व विकासाची मोठी संधी मिळेल, असा विश्र्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या भारताला पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्यासाठी नीती आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महाराष्ट्रात काम केले जात असून एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट मुंबई महानगर प्रदेश (एम एम आर डी ए) च्या योगदानातून सहज गाठेल तर संपूर्ण राज्यातून यात वाढ होईल. राज्यात होत असणाऱ्या नवीन उपक्रमांमधून चांगले व गुणवत्तापूर्ण काम कालबद्ध वेळेत व्हावेत, अशीही अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, महाराष्ट्राच्या विकासाला मोठी गती मिळाली आहे. इकोसिस्टम मजबूत करताना उद्योग, रोजगार निर्मिती केली जाते आहे. सौर ऊर्जेसाठी जास्तीत जास्त प्रयत्न केले जात असून देशाच्या ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी महाराष्ट्राने उद्योग, ऊर्जा आदी क्षेत्रांच्या माध्यमातून एक ट्रीलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी गती घेतली आहे. जलविद्युत, औष्णिक वीज निर्मिती या ऊर्जा स्रोतांना मर्यादा असून यामुळे राज्य सौर ऊर्जा, पवनऊर्जा अशा अपारंपरिक, नवीनीकरणीय ऊर्जा स्रोतांवर भर देत आहे. असे सांगून, उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी दावोस मधील विविध सामंजस्य करारांमुळे राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतणूक होत आहेत याबाबत समाधान व्यक्त केले.

रत्नागिरी येथील कोकण रेल्वे, अपेडा व महाप्रित यांच्या सहयोगातून २ हजार टन क्षमतेच्या शीतगृह प्रकल्पामुळे कोकणातील आंबा व मासे निर्यात वाढणार असून या प्रकल्पासाठी रेल्वेने विनामूल्य जमीन उपलब्ध करून दिल्याने मुख्यमंत्री श्री. शिंदे व उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी यावेळी धन्यवाद व्यक्त केले.

बृहन्मुंबई महानगरपालिका व महाप्रित यांच्या सहकार्यातून सौर ऊर्जा निर्मितीसाठी मुंबईस पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांवर फ्लोटिंग सोलार प्रकल्पाचे सामंजस्य करारावर महानगरपालिका आयुक्त श्री. चहल व महाप्रितचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शिंदे यांनी स्वाक्षरी करून संचिकेचे आदान - प्रदान केले. या प्रकल्पात ६ हजार कोटी रुपये गुंतवणुक होत आहे. राज्यातील विविध जिल्ह्यातील या प्रकल्पांच्या शुभारंभ व भूमिपूजन कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, महामंडळाचे पदाधिकारी, विविध विभागांचे अधिकारी प्रत्यक्षात व ऑनलाईन व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे उपस्थित होते.

### इस्रोपाठोपाठ डीआरडीओच्या

आली आहे. भारत सरकारने १९८३ मध्ये Integrated Guided Missile Development Programme (IGMDP) कार्यक्रम हाती घेण्यात आला. यामाध्यमातून जमिनीवरुन हवेत, हवेतून हवेत मारा करणारी विविध क्षमतेची क्षेपणास्त्रे ही विकसित करण्याचे निश्र्चित आले. त्याचाच एक भाग म्हणून अग्नी नावाने विविध लांब पल्लयांची क्षेपणास्त्रे विकसित करण्यात आली. अग्नी-५ हे त्याचं सर्वात शक्तीशाली स्वरुप आहे. हे क्षेपणास्त्र १७.५ मीटर उंच, दोन मीटर व्यास आणि ५० टनापेक्षा जास्त वजनाचे आहे. अग्रभागावर तब्बल तीन टनापर्यंतची स्फोटके वाहून नेण्याची क्षमता अग्नी-५ मध्ये आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तब्बल पाच हजार किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावर मारा करण्याची हा क्षेपणास्त्राची क्षमता आहे.. जून २०१८ ला हे क्षेपणास्त्र संरक्षण दलात दाखल करण्यात आलं.

अग्नी ५ च्या मारक क्षमतेमुळे ते आंतरखंडीय क्षेपणास्त्र म्हणून ओळखलं जातं. म्हणजे एका खंडातून दुसऱ्या खंडात मारा करण्याची क्षमता यामुळे भारताला मिळाली आहे. हे क्षेपणास्त्र पृथ्वीच्या वातावरणाबाहेर जात पुन्हा पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करते. या क्षेपणास्त्रामुळे संपूर्ण चीन हा भारताच्या टप्प्यात आला आहे. वेळ पडल्यास ३ टनापर्यंतची स्फोटके किंवा अण्वस्त्रे वाहून नेण्याची अग्नी ५ ची क्षमता आहे. त्यामुळेच अग्नी ५ ला दिव्यास्त्र किंवा ब्रह्मास्त्र म्हणून ओळखलं जातं. या क्षेपणास्त्रामुळे शत्रूपक्षावर रणनीति बदलण्याची वेळ आली.

### पुस्तकांने मन आणि मस्तकासह

एक बैठक बोलावू.

जिल्हा ग्रंथालय कार्यालय अधिकारी संतोष जाधव आपल्या प्रास्ताविकात बोलताना म्हणले की, सोलापूर जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळ व ग्रंथालये नागरिकांना सेवा देण्यास आग्रेसर आहेत.

कार्यक्रमाचे उद्घाटन माध्यमिकचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विजय कोलते, सहाय्यक ग्रंथालय संचालक शालिनी इंगोले, साहित्यिक श्रीमती श्रुती वडकबाळकर, दयानंद महाविद्यालय शिक्षण शास्त्रचे प्राचार्य श्रीरंग क्षीरसागर, दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय प्राचार्य विजयकुमार उबाळे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय सोलापूर श्री संतोष जाधव सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विजयकुमार पवार, कवी मारुती कटकधोंड,ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, हरिदास रणदिवे, पद्माकर कुलकर्णी, विलास शहा, जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे, जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक प्रकाश शिंदे, विनोद गायकवाड,संघाचे कार्यवाहक साहेबराव शिंदे, अनसर शेख, भीमाशंकर बिराजदार, सिध्दलिंगेश्र्वर बेडगणूर आदी मान्यवर विचारपीठावर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक प्रवीण देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जिल्हा ग्रंथालय निरीक्षक प्रमोद पाटील यांनी केले.सदर कार्यक्रम यशस्वी नीटनेटका करण्याचे काम जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय सोलापूर येथील सहाय्यक प्रदीप गाडे, महेश कुलकर्णी, जगदीश परमशेट्टी, ज्योतीराम चांगभले, सदाशिव बेगडे व नरसिंह मिसालोलू यांनी अथक परिश्रम घेतली.

### अवघ्या २४ तासात भाजपचे दोन

एक मुद्दा उपस्थित करण्यात आला आणि हरियाणातील भाजप-जेजेपी युतीबाबत निर्णय घेण्यात आला. भाजप सोडण्यामागे तेही एक कारण आहे. ब्रिजेंद्र सिंह हे माजी केंद्रीय मंत्री बिरें सिंह यांचे पुत्र असून त्यांच्या कुटुंबाचा काँग्रेसशी दीर्घकाळ संबंध आहे. कुलदीप बिश्र्नोई यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर ब्रिजेंद्र सिंह यांचे तिकीट रद्द होण्याची शक्यता होती. याशिवाय जेजेपी युतीमुळेही ब्रिजेंद्र सिंह भाजपवर नाराज होते.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी दुष्यंत चौटाला आणि भव्य बिश्र्नोई यांचा पराभव करून हिसारमधून विजय मिळवला. माजी नोकरशहा आणि प्रसिद्ध शेतकरी नेते छोटू राम यांचे ते पणतू आहेत. त्यांचे वडील बिरेंद्र सिंह यांनी केंद्रीय मंत्री म्हणून काम केले आणि आई प्रेमलता सिंग यांनी उचाना विधानसभेचे प्रतिनिधित्व केले. ब्रिजेंद्र सिंग हे लोकलेखा समिती आणि संरक्षणविषयक स्थायी समितीचे सदस्यही आहेत. ते माजी भारतीय प्रशासकीय सेवा (ख-ड) अधिकारी आहेत, त्यांनी २१ वर्षे देशाची सेवा केल्यानंतर स्वेच्छानिवृत्ती घेतली. १९९८ मध्ये त्यांनी नागरी सेवा परीक्षेत ९ वा क्रमांक मिळविला. ब्रिजेंद्र सिंह यांनी जेएनयूमधून आधुनिक इतिहासात एमए केले आहे. ते मुळचे हरियाणातील जिंद येथील रहिवासी आहेत.

## राज्यात अल्पसंख्याक आयोग व जिल्हा कक्ष स्थापण्याच्या निर्णयामुळे अल्पसंख्याकांच्या विकासयोजनांची अंमलबजावणी गतिमान होणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार हे अल्पसंख्याक बांधवांची बाजू भक्कमपणे मांडत असून त्यांच्या पुढाकारामुळे अल्पसंख्याक बांधवांच्या हिताचे अनेक निर्णय राज्य शासनाने घेतले आहेत. आज (११ मार्च) मंत्रिमंडळ बैठकीत छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्याक आयुक्तालय तसेच जिल्हास्तरावर अल्पसंख्याक कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे अल्पसंख्याक बांधवांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासयोजनांची अंमलबजावणी गतिमान होईल. अल्पसंख्याक बांधवांना विकास आणि निर्णय प्रक्रियेत योग्य प्रतिनिधित्व मिळेल,



असा विश्र्वास जमात-ए-उलेमा हिंद संघटनेचे दिल्लीतील अध्यक्ष मौलाना सय्यद मेहमूद मदानी, राज्य अध्यक्ष नदीम सिद्दीकी, 'जमिअत-उलेमा-ए-महाराष्ट्र' संघटनेसह अनेक मुस्लिम तसेच अल्पसंख्याक संस्था, संघटनांनी व्यक्त केला असून अल्पसंख्याक बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याबद्दल उपमुख्यमंत्री श्री. पवार यांचे आभार मानले आहेत.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत, छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्याक आयुक्तालय स्थापन करण्याचा तसेच जिल्हास्तरावर अल्पसंख्याक कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, अल्पसंख्याक विकास विभागाच्या अधिपत्याखाली हे आयुक्तालय असणार आहे. जिल्हा नियोजन अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली अल्पसंख्याक कक्ष निर्माण करण्यात येणार आहे. अल्पसंख्याक आयुक्तालय कार्यालयासाठी एकूण ३६ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. प्रत्येक जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली अल्पसंख्याक कक्ष निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन अधिकारी हे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी म्हणून काम पाहतील. राज्यातील ३६ जिल्ह्यातील अल्पसंख्याक कक्षाकरिता एकूण ८५ पदे निर्माण करण्यात येतील.

नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या अल्पसंख्याक आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील ३६ पदांच्या वेतनासाठी वार्षिक २ कोटी २० लाख रुपये व कार्यालयीन खर्चासाठी दरवर्षी ४० लाख रुपये खर्चास तसेच ३६ जिल्हास्तरावरील अल्पसंख्याक कक्षांच्या एकूण ८५ पदांच्या वेतनासाठी दरवर्षीच्या २ कोटी २५ लाख रुपयांच्या खर्चास तसेच कार्यालयीन खर्चासाठी ३ कोटी ६० लाख रुपये अशा एकूण ८ कोटी ४५ लाख रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतूदीस मान्यता देण्यात आली. राज्य मंत्रिमंडळाने घेतलेला हा निर्णय मुस्लिम, अल्पसंख्याक बांधवांच्या जीवनात अमूलाग्र बदल घडवून आणण्यास सहाय्यभूत ठरेल, असा विश्र्वासही 'जमिअत-उलेमा-ए-महाराष्ट्र' संघटनेसह अनेक मुस्लिम तसेच अल्पसंख्याक संस्था, संघटनांनी व्यक्त केला आहे.

## पंजाबमध्ये शेतकऱ्यांचे 'रेल रोको'; घोषणाबाजी करत दिला पाठिंबा


नवी दिल्ली : गेल्या २७ दिवसांपासून आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांनी रविवारी आपला मोर्चा रेल्वेकडे वळवला. आपल्या विविध मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी फिरोजपूर, अमृतसर, रूपनगर आणि गुरुदासपूर जिल्ह्यांसह पंजाबमधील अनेक ठिकाणी रेल्वे रुळांवर दुपारी १२ ते ४ यावेळेत 'रेल रोको' आंदोलन केले. तसेच सरकार विरोधात घोषणाबाजी करताना मागण्या मान्य करण्याची मागणी केली. यावेळी दुपारी १२ वाजल्यापासून चंदीगड, देविदासपुरासह पंजाबमधील अनेक भागात शेतकरी रेल्वे रूळाकडे निघाले होते. यावेळी 'रेल रोको' आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अमृतसरच्या देविदासपुरा भागात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी शेतकऱ्यांनी आपल्यासोबत खाटा, चटई व इतर साहित्यही आणले होते. दुपारी ४ वाजताच चंदीगड, देविदासपुरासह पंजाबमधील अनेक भागात रेल्वे रूळांवर बसलेले शेतकरी बाजूला झाले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# दर्शनाळ गावातील ग्रा.प. सदस्य तिरडी घेवून उपोषण केले, कार्यवाहीसाठी चौकशी समिती नेमले

अक्कलकोट/प्रतिनिधीः रोजगार हमीच्या कामामध्ये मजुरांच्या खोट्या हजेरी नोंदवून शासकीय निधीचा गैरवापर करून सरपंच यांनी पदाचा दुरुपयोग केल्याप्रकरणी दर्शनाळचे ग्रा.पं. सदस्य आकाश माने हे तिरडी घेऊन उपोषण



केले होते.झालेल्या सिमेंट काँक्रीट रस्त्याची चौकशी करून पंधरा दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश गटविकास अधिकाऱ्यांनी दिले.संबंधितांचे धाबे दणाणले आहे.

रोजगार हमी योजनेतर्गत झालेल्या बोगस कामाची चौकशी करण्याबाबत दर्शनाळचे ग्रा.पं.सदस्यांनी अक्कलकोट पंचायत समिती व जिल्हाधिकारी यांना लेखी पत्र देले असता त्याच्याकडून कोणतीच हालचाली न दिसुन आल्याने आकाश माने यांनी तिरडी घेऊन अक्कलकोट पंचायत समितीच्या गेटसमोर आमरण उपोषणाला बसले होते.पंधरा दिवसात चौकशी करून दोषीवर कारवाई करण्याचे लेखी पत्र प्रभारी गट विकास अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी दिल्याने उपोषण मागे घेण्यात आले.

दर्शनाळ येथे गेल्या काही महिण्यापुर्वी रोजगार हमी योजनेंतर्गत सिमेंट रस्त्याचे काम हाती घेण्यात आले होते.सरपंच हे राजकीय हेतूने पक्षातील लोकांचे हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करीत संबंधितांना खूश करण्यासाठी,मजूर कामावर हजर नसतानही खोट्या हजेऱ्या नोंदविल्या आहे.कामावर बोगस हजेरी

**योग्यरीत्या चौकशी करावी,चौकशी अंति दोशी आढळणाऱ्या संबंधितावर रितसर फौजदारी कारवाई करण्यात यावी,चौकशी दरम्य–आकाश माने ग्रा.पं.सदस्य दर्शनाळ,अक्कलको**

लावून निधीचा गैरवापर केला आहे.तसेच १५वा वित्त आयोगाचे दलित वस्तुमधील काम अतिशय निकृष्ट व खालच्या पातळीवर झाले बाबत, व गरज नसतांना कामे केले आहे. वार्ड क्र. दोन व तिनमधील भुमीगत गटार, मुस्लीम गल्लीतील सी.सी रोडसह पाणी पुरवठा योजनेच्या कामासंबंधी तक्रार आकाश माने यांनी केले आहे. वरील सर्व तक्रार कामाची चौकशी करण्याबाबत गटविकास अधिकाऱ्यांनी पाच सदस्यीय कमिटी मार्फत चौकशी आदेश देले आहे.त्यात उपअभियंता ल.पा.एसएस उंमरजे,शाखा अभियंता एसबी बशेट्टी,विस्तार अधिकारी बीके गुरव,विस्तार अधिकारी जेपी माने, विस्तार अधिकारी आयएम पठाण यांचा समावेश आहे.

# श्री माणकेश्वर वाचनालयात निफाड येथे महिलादिन साजरा

निफाड/प्रतिनिधीः जागतिक महिला दिनानिमित्त श्री माणकेश्र्वर वाचनालय निफाड सभागृह येथे महिलांसाठी विशेष स्पर्धेचे आयोजन करून विजयी महिला स्पर्धकांचा व निफाड शहरातील विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचा . सत्कार करण्यात आला .सालाबाद प्रमाणे याही वर्षी सामाजिक कार्यात मोलाचे योगदान देणाऱ्या श्रीमानकेश्र्वर वाचनालयाचे वतीने जागतिक महिला दिनानिमित्त क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमेचे पूजन निफाड नगरपंचायत च्या नगराध्यक्षा डॉ. कविता धारगाव व उपस्थितांचे वतीने करण्यात आले .




यावेळी संगमेश्र्वर नागरी पतसंस्थेचे चेअरमन गौरव राठी, व्हा.चेअरमन गणेश नागरे ,डॉ. असोसिएशनचे अध्यक्ष डॉ भूषण राठी, उपाध्यक्ष डॉ. रोहित धोक्रट, सुवर्णकार असोसिएशनचे अध्यक्ष तुषार अदापुरे ,उपाध्यक्ष विकी बागुल, निफाड नागरी पतसंस्थेचे चेअरमन अशोक पोफळीया इरफान पठाण, तसेच विना भारद्वाज ,कार्यक्रमाचे आयोजक महेश जंगम, नगरसेविका पल्लवी जंगम विपुल मुथा, मनीषा मुथा, यांचा सत्कार करण्यात आला,

याप्रसंगी नगराध्यक्ष कविता धरराव डॉ रोहित धोक्रट यांनी आपले मनोगत व्यक्त केले महिलांच्या विविध गुणदर्शन स्पर्धेत विजयी झालेल्या प्रथम.क्र मालती वाघावकर द्वितीय क्रं.छाया श्रीवास्तव तृतीय क्र .सौ भुतडा यांना पारितोषिक व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले

याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम, चिटणीस बाळासाहेब कापसे, सहचिटणीस राहुल दवते, हिशोब तपासणीस दत्ता काका उगावकर, संचालक तनवीर राजे, सुहास सुरळीकर ,निळकंठ कुंदे, राजेंद्र खालकर ,सुजाता तनपुरे, सीमा भांडारकर, नारायण भांडारकर ,संतोष गिरी, स्मिता गोसावी, कुलकर्णी, कदम ,रचना कुमावत ,निशा वाघ, जयश्री कुंभार्डे ,लोखंडे ,ग्रंथपाल नितीन बनसोडे, लेखनिक विद्या बेंद्रे, अनिता कांबळे, आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधुकर शेलार, यांनी केले तर सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले असून उपस्थितांचे आभार बाळासाहेब कापसे, सुजाता तनपुरे यांनी मांनले,

# बदलत्या काळानुसार विविध क्षेत्रात महिलांनी आपले अस्तित्व सिद्ध केले आहे : क्षिरसागर

## जागतिक महिला दिनानिमित्त मोरे विद्यालयात महिलांचा सन्मान

निफाड/प्रतिनिधीः ज्या समाजामध्ये स्त्रीचा सन्मान केला जातो. तिला मान दिला जातो. त्या समाजाचा विकास झपाट्याने होत असतो. आजही भारतीय संस्कृती ही एक आदर्श संस्कृती म्हणून गणली जाते ते केवळ स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या सन्मानामुळे. स्त्रियांकडे




अफाट अशी निर्णय क्षमता असते. आजच्या काळातील स्त्री ही कोणत्याही क्षेत्रामध्ये मागे नाही.शिक्षणक्षेत्रामध्ये विशेषतः मविप्र समाज संस्थेत आज ६५ ते ७० टक्के महिला शिक्षक/ प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत यावरून महिला ही अबला नसून सबला आहे. बदलत्या काळाबरोबर स्त्री मोठी कौशल्य आत्मसात करते, वैद्यकीय क्षेत्र, संरक्षण क्षेत्र, संशोधन क्षेत्र अशा आणि इतर कितीतरी क्षेत्रांमध्ये स्त्रियांनी आपले अस्तित्व सिद्ध केले आहे. असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. बाळासाहेबजी क्षिरसागर ( सभापती मविप्र समाज नाशिक ) यांनी केले.

कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड येथे जागतिक महिला दिन साजरा झाला. यावेळी इन्फोसिस कंपनी पुणे यांच्या सोबत झालेल्या शैक्षणिक करारात महाविद्यालयाला मिळालेले ३० स्प्रिंगबोर्ड टॅब यांचे मा. बाळासाहेब क्षीरसागर आणि मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या वंदना जाधव यांनी मनोगतात बहिणाबाई, संत मीराबाई, माता जिजाऊ, इंदिरा गांधी, चित्तोडची महाराणी अक्का महादेवी यांच्या कार्यकर्तृत्वाच्या कथा सांगून स्त्रियांमधील शक्तीची जाणीव करून दिली तर दुसऱ्या बाजूने आजच्या काळातील विकसित स्त्रीने मोबाईल चा विवेकी वापर करावा असा सल्ला देखील सर्वांना दिला.

स्त्रियांनी सर्व क्षेत्रात आपल्या भोवती एक हाताचे अंतर ठेऊन कोणतेही कार्य केल्यास ती निश्र्चितच सुरक्षित राहील असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी कार्यक्रमात निफाड च्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा डॉ. कविताताई धाराराव याचा यथोचित सत्कार करण्यात आला. त्यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयाच्या आठवणींना उजाळा दिला. डॉ. सीमा डेरले यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.के शिंदे यांनी महिला दिनाचे महत्त्व विशद केले.

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री ठामपणे उभी असते. कधी ती आईच्या रूपात, कधी बहिणीच्या तर कधी पत्नीच्या कधी मैत्रिणीच्या तर कधी मुलीच्या रूपामध्ये ती असते. हे अनेक उदाहरणे देऊन सांगितले.

याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व महिला प्राध्यापक यांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती व्ही. बी. गीते तर आभार प्रदर्शन श्रीमती एस. आर. तायडे यांनी केले.कार्यक्रम यशस्वितेसाठी डॉ. एम. बी. वाघ, डॉ. सुजाण लोरेंसिया, श्रीमती एस. जी. उफाडे. डॉ. एस. आर. जाधव, डॉ. बी. सी. आहेर, प्रा. पी. डी. आहेर, आर. आर. जगताप, .आर. के. डुंबरे, पी. सी. खापरे, पी. बी. बोचरे, डॉ. स्वाती पवार, सेवक कल्पना लगड, . वनिता बोरगुडे, प्रा. महेश बनकर, प्रा. एस. आर. ढोली, प्रा. अतुल आहेर, डॉ. प्रवीण ढेपले, चेतन कुंदे, चंद्रशेखर मोरे, प्रा. व्हि. डी. ससाणे, सर्व विभागप्रमुख आणि सर्व प्राध्यापक प्राध्यापकेतर सेवक यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नळदुर्ग तालुका निर्मिती करून ऐतिहासिक शहराला मुख्यमंत्र्यांनी न्याय द्यावा

## मनसेचा ११५ पानी अहवाल जिल्हाधिकाऱ्यां मार्फत मुख्यमंत्र्याकडे सादर




नळदुर्ग/दादासाहेब बनसोडेः धाराशिव –राज्यात नवीन ४९ तालुके निर्मिती होणार असून त्याच अनुषंगाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी यांनी संकल्पित नळदुर्ग तालुक्याचा ११५ पानी अहवाल तयार केला आहे यामध्ये,निवेदन,नकाशा,प्राथमिक माहिती,ऐतिहासिक याच ऐतिहासिक शहराला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा ना एकनाथराव शिंदे यांनी ऐतिहासिक शहराला न्याय द्यावा अशी मागणी जोर करत आहे

पार्श्र्वभूमी,सोयी सुविधा,सुविधेचा अभाव,उद्योग धंदे क्षेत्रफळ लोकसंख्या शासकीय पत्रे,विविध समित्याची माहिती,उपलब्ध जागा व इमारती,पालिकेचा ठराव,विविध ४२ ग्रामपंचायतीचा ठराव या अहवालात समाविष्ट आहे,राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे हा अहवाल सादर करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्या मार्फत देण्यासाठी मा.सचिन ओंबासे यांची मनसेच्या शिष्टमंडळाने भेट घेतली,व नळदुर्ग तालुक्याच्या निर्मिती बाबत प्रशासकीय यंत्रनेमार्फत शासनाकडे हा अहवाल द्यावा,असे चर्चे दरम्यान पदाधिकाऱ्यांनी विनंती केली,यावेळी जिल्हा उपाध्यक्ष महेश जाधव,जिल्हा सचिव ज्योतिबा येडगे,तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन कुंभार,नळदुर्ग शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी,मनविसे ता.उपाध्यक्ष गणेश बिराजदार हे उपस्थित होते,नळदुर्ग हे पूर्वी जिल्ह्याचे ठिकाण होते या ठिकाणी मामलेदार कचेरी होती,स्वातंत्र्या नंतर हि मुंसिफ कोर्ट हे नळदुर्ग येथेच होते,शहराच्या आसपास ६० गावे असून ग्रामपंचायती ४२ आहेत,ज्यांची लोकसंख्या सव्वा लाखाच्या जवळ आहे,ज्या ज्या वेळी राज्य शासनाने तालुका पुर्नरचना समित्या स्थापन केल्या त्या त्या वेळी नळदुर्ग तालुका सोयीस्कर आहे असाच अहवाल दिला होता,परंतु दरवेळी नळदुर्ग वर अन्याय होऊन इतक्या मोठ्या लोकसंख्या असलेल्या भागाला सद्याच्या तालुक्याच्या ठिकाणी जाऊन त्रास सहन केल्या शिवाय पर्याय नाही,परंतु राज्य शासनाने नवीन तालुके निर्मिती करण्याच्या घोषणे नंतर पुन्हा एकदा आशा पल्लवीत झाल्या असून किमान आता तरी नळदुर्ग तालुक्याची निर्मिती व्हावी असे दिलेल्या अहवालातील निवेदनात म्हंटले आहे,निवेदनावर जिल्हा उपाध्यक्ष महेश जाधव,जिल्हा सचिव ज्योतिबा येडगे,तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन कुंभार,विधानसभा अध्यक्ष मयूर गाढवे ता.सरचिटणीस गणेश पाटील नळदुर्ग शहराध्यक्ष अलिम शेख, शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी,जनहित कक्षाचे ऍड.मतीन बाडेवाले,शहर संघटक रवि राठोड,शहर उपाध्यक्ष रमेश घोडके,मनविसे ता.अध्यक्ष सूरज चव्हाण,ता.उपाध्यक्ष गणेश बिराजदार,शहराध्यक्ष निखिल येडगे यांच्या स्वाक्षरी आहेत.

# हन्नुर जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्षपदी कोंडीबा सोनकांबळे



अक्कलकोट/प्रतिनिधी : विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ व न्यू भीम क्रांती तरुण मंडळ हन्नुर यांच्या संयुक्त विद्यमाने १३३ व्या यांची बैठक पार पडली यंदाच्या वर्षी उत्सव अध्यक्ष: कोंडीबा सोनकांबळे यांची एक मताने निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष:सागर तूपसाखरे सचिव:वसंत मनोहर बनसोडे सहसचिव:सतिश चुडामणी बाळशंकर खजिनदार :सतीश श्रीमंत बाळशंकर सहखजिनदार:अजय दुपारगुडे मिरवणुक प्रमुख:सुभाष दुपारगुडे म्हाळाप्पा सोनकांबळे ,लक्ष्मण विश्र्वनाथ बाळशंकर, उमेश बाळशंकर,युवराज बाळशंकर, उत्तम भिवा बाळशंकर, आधारस्तंभ: चंद्रमणी बाळशंकर, परशुराम बाळशंकर,त्रिमुख बाळशंकर, अंकुश गजधाने,दिलीप (पोलिस)बाळशंकर,बाळू पुटगे, सदानंद माणिक बाळशंकर,निलेश बाळशंकर,नागेश मुगळे,रवींद्र बाळशंकर,आंबाण्णा बाळशंकर,जयाप्पा बाळशंकर, श्रीकांत पाटील, बालाजी बाळशंकर,दत्ता बाळशंकर,भीमा बाळशंकर,संगप्पा बाळशंकर, उत्तम जयानंद बाळशंकर,सिद्धार्थ बनसोडे,महादेव सोनकांबळे, लक्ष्मण हरीशचंद्र बाळशंकर यंदाच्या वर्षी सामाजिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत असे जयंती उत्सव मंडळ कमिटीच्या वतीने सांगण्यात आले या बैठकीस समाजातील मोठ्या संख्येने सर्व समाज बांधव उपस्थित होते या बैठकीचे सूत्रसंचालन व गोविंद बाळ शंकर व आभार संतोष दावण्णा बाळशंक यांनी केले

# सुहांना समीर चौगले उत्कृष्ट बाल निवेदिका माणकापुरात निसर्गराजा ग्रुपच्यावतीने प्रेरणा पुरस्कार प्राप्त


सैनिक टाकळी/संजय चव्हाण : माणकापूर तालुका :निपाणी येथील निसर्गराजा ग्रुपच्यावतीने खास महाशिवरात्री यात्रेनिमित्त व जागतिक महिला दिनानिमित्त साहित्यिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक, उद्योग, व्यवसाय, पत्रकार, छायाचित्रकार, अभिनय, गायन अशा विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय समाजकार्य करणाऱ्या मान्यवरांना यावर्षीचा १९ वा कर्नाटक राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार २०२४ चा वितरण सोहळा सदर पुरसप्रमुख मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सदर प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आले.



# महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे मानधन घेणाऱ्या वृद्ध कलावंतांना आवाहन

## शाहीर सुभाष गोरे यांनी कागदपत्रे जमा करण्याचे केले आवाहन

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभागाच्या माध्यमातून राज्यातील वृद्ध कलावंत व साहित्यिक यांना दरमहा मानधन देण्याची योजना सुरू आहे या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील अ, ब व क श्रेणीसाठी वृद्ध कलावंतांना मानधन दिले जाते यापूर्वी ही मानधन योजना २०१४ पर्यंत जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत होती त्यानंतर २०१५ – १६ पासून सदर योजना सांस्कृतिक कार्य संचलनालयामार्फत राबविण्यात येत आहे २०१५ –१६ पूर्वी ही योजना समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असल्याने सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे या योजनेअंतर्गत असलेल्या लाभार्थींची संपूर्ण माहिती उपलब्ध नाही सध्यास्थितीत या योजनेखाली लाभार्थींची निवड जिल्हास्तरावरील निवड समितीमार्फत होत असते या योजनेअंतर्गत दरवर्षी प्रत्येक जिल्ह्यातून १०० कलाकार व साहित्यिकांची निवड करण्यात येत असते या योजनेखालील लाभार्थींची वैयक्तिक माहिती जसे की आधार क्रमांक; संपर्क क्रमांक ; कलेचा प्रकार ; कलाकार वारसदार कलावंतांचे संपूर्ण नाव ; संपूर्ण पत्ता ;मानधन कधीपासून मिळत आहे ; कलावंतांचे



वय ; बँक तपशील खाते क्रमांक; व आय एफ सी एस कोड ; एकत्रित फोटो ; माहिती संकलन करावयाची आहे यासाठी सोलापूर जिल्ह्यातील कलावंतांनी दिनांक १५ मार्चपर्यंत ही माहिती कागदपत्र तालुक्याचे गटविकास अधिकारी पंचायत समिती वृद्ध कलावंत मानधन टेबलला किंवा पत्रात द्यावी अगर शक्य असल्यास सांस्कृतिक कार्य संचालनालयास mahaculturegmail.com यावर पाठवावी प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण प्रक्रियेसाठी या योजनेखाली लाभार्थींची माहिती देणे आवश्यक आहे या माहितीचे संकलन करण्याची प्रक्रिया दिनांक १५ मार्च पर्यंत शासनास सदर माहिती सादर करावी अशी माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई यांचे मार्फत एका पत्रकाद्वारे कळविण्यात आली आहे अन्यथा दिनांक १ एप्रिल २०२४ पासून मानधनाचा लाभ मिळणार नाही सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई यांना मानधन घेणाऱ्या वृद्ध कलावंतांनी त्वरित माहिती संकलन करावी असे आवाहन लोककलावंत प्रबोधन परिषद महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष सोलापूर जिल्हा वृद्ध कलावंत मानधन समितीचे माजी सदस्य शाहीर सुभाष गोरे यांनी केले आहे अधिक माहितीसाठी ९७ ६३ ० ३ ८८ ७१ या नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे

# पंढरपूरात खेळ मांडियेला.. वाळवंटी काटी म्हणत..आदेश भाऊजींच्या कार्यक्रमास अलोट गर्दी

## विधानसभेची साखर पेरणी करत अभिजीत आबाच आमदार होणार महिला वर्गातून भरभरून आशीर्वाद



पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री.अभिजीत आबा पाटील यांच्या माध्यमातून विठ्ठल प्रतिष्ठान आयोजीत जागतिक महिला दिनाच्या पार्श्र्वभूमीवर खेळ मांडीयेला या कार्यक्रमाचे या कार्यक्रमाचे आयोजन रेल्वे मैदान, पंढरपूर येथे करण्यात आले होते.. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात लाखो कुटुंबांना भेट देऊन कुटुंबातील माता-भगिनींना आनंद देत त्यांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करणाऱ्या लाडक्या आदेश भाऊजी म्हणजेच श्री आदेश बांदेकर यांचे निवेदन सूत्रसंचालन या कार्यक्रमाला लाभले..

गप्पा, गोष्टी, मनोरंजन यांच्यासह माता-भगिनींच्या कौशल्याला सुप्त गुणांना या कार्यक्रमामधून वाव मिळाला. शेकडो भगिनींनी यात प्रत्यक्ष सहभाग घेऊन बक्षिसे मिळवली..

आयोजक विठ्ठल प्रतिष्ठान व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते व श्री विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या माध्यमातून नेहमीच वेगवेगळया कार्यक्रमांची पर्वणी पंढरपूरकरांना अनुभवता येत असते. खेळ मांडीयेला या कार्यक्रमात तब्बल १५,००० हून अधिक महिला व नागरिकांनी यात सहभाग घेतला होता..

विकासासह पंढरपूरकरांची आपुलकीने काळजी घेत अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करणाऱ्या अभिजीत आबांना माता-भगिनींनी भरभरून आशीर्वाद तर दिलेच परंतु येणाऱ्या काळात विधानसभा निवडणुकीत आमचे अभिजीत आबाच निश्र्चित आमदार होणार हे देखील मनोगतात मांडले.. तर जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना दोन क्षण आनंदाचे देऊन दैनंदिन कार्यातून क्षणभर विरंगुळा आणि समाधान देता यावा. असेच प्रतिसाद पुढील काळात साथ, आशीर्वाद पाठीशी असावे असे अभिजीत पाटील यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सुसज्ज आयोजन विठ्ठल प्रतिष्ठानच्या सदस्यांनी केल्याबद्दल चेअरमन अभिजीत पाटील यांनी कौतुक केले.

यावेळी धनश्री पतसंस्थेच्या संस्थापक शोभा काळुंगे, उपनगराध्यक्ष श्र्वेता डोंबे, माजी नगराध्यक्ष उज्वला भालेराव, अभिजीत पाटील यांच्या मातोश्री जयश्री पाटील, जयमाला गायकवाड, सुमित्रा अभिजीत पाटील, राजश्री ताड, शिवसेना (उबाठा) संभाजीराजे शिंदे, मनसेचे नेते दिलीप धोत्रे,

राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) सरचिटणीस अभयसिंह जगताप, नागेश गंगेकर, आदित्य फत्तेपूरकर, राष्ट्रवादी (शरद पवार) गटाचे सुधीर भोसले, तालुकाध्यक्ष संदीप मांडवे, शहराध्यक्ष चंद्रशेखर कौंडूभैरी, माढा तालुकाध्यक्ष भाऊसाहेब महाडिक, तसेच विठ्ठल कारखान्याचे संचालक, धाराशिव कारखान्याचे संचालक, डीव्हीपी बँकेचे संचालक मंडळासह तमाम पंढरपूर महिला भगिनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला...

# विशेष पोलीस महानिरीक्षकांकडून मंगळवेढा पोलीस ठाण्याची तपासणी



मंगळवेढा/प्रतिनिधीः मंगळवेढा पोलीस ठाण्याची वार्षिक तपासणी कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी केली. या वार्षिक तपासणीनंतर गेले महिनाभर तणावाखाली असणारे पोलीस कर्मचारी तणावमुक्त झाल्याचे दिसून येत होते. कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक फुलारी हे मागील महिन्यात वार्षिक तपासणी करणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, मराठा आरक्षणासाठी सर्वत्र मनोज जरांगे-पाटील यांचे आंदोलन सुरू असल्याने सर्व पोलीस कर्मचारी बंदोबस्तात व्यस्त होते. त्यामुळे ही वार्षिक तपासणी पुढे ढकलण्यात आली होती. दरम्यान, वार्षिक तपासणीच्या पार्श्वभूमीवर सर्व पोलीस कर्मचार रात्रंदिवस पेंडिंग गुन्हे व अर्ज निर्गती करण्यात व्यस्त होते. विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांचे पोलीस ठाण्याच्या आवारात आगमन होताच पोलिसांनी त्यांना सलामी देत स्वागत केले. त्यानंतर त्यांच्या हस्ते १० लाख खर्चून उभारण्यात आलेल्या ओपन जीमचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. पोलीस निरीक्षक रणजित माने यांच्या प्रयत्नातून पोलीस ठाण्याच्या आवारात हे जीम उभारण्यात आले आहे. वार्षिक तपासणीमध्ये फुलारी यांनी परेड पाहणी, क्राइम दप्तर, गोपनीय विभाग, मुद्देमाल विभाग तसेच इमारतीमधील प्रत्येक खोलीत जाऊन सूक्ष्म पाहणी केली. यावेळी उपस्थित कर्मचारी व अधिकारी यांना कामकाजाबाबत योग्य मार्गदर्शन करुन कामकाजाबाबत सूचना केल्या. यावेळी पोलीस अधीक्षक शिरीषकुमार सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक प्रितमकुमार यावलकर, पोलीस उपअधीक्षक विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक रणजित माने, सहायक पोलीस निरीक्षक रेवण डमाळे, अंकुश वाघमोडे, बापूसो पिंगळे, पोलीस उपनिरीक्षक पुरुषोत्तम धापटे, हणमंत हिप्परकर उपस्थित होते.

# उन्हाळ्यात सुट्ट्यांमुळे रेल्वे आरक्षण फुल्ल

सोलापूर/प्रतिनिधीः उन्हाळ्यात मुलांच्या शाळांना सुट्ट्या लागल्यानंतर अनेकजण आपल्या पाल्यासह पालक फिरायला जातात. शाळेला सुट्ट्या लागायला काही दिवसच शिल्लक राहिले असून विवाह सोहळे, धार्मिक स्थळी, पर्यटनस्थळी, आप्तेष्टांच्या गावी जाण्यासाठी तिकिटे मिळत नसून या कालावधीतील रेल्वे तसेच एसटी बसचे आरक्षण जवळपास फुल्ल होत आहे.

नागरिकांना गावाला, फिरायला देशभरात विविध ठिकाणी जाण्यासाठी रेल्वेने प्रवास करणे परवडते. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये गावाला जाण्यासाठी सर्वाधिक गर्दी पुणे, मुंबईसह इतर मार्गांवर असते. सोलापूरहून अनेक ठिकाणी जाणाऱ्या रेल्वेगाड्यांची तिकिटे आतापासूनच बुक झाली आहेत.

त्यामुळे प्रवाशांवर उभे राहून प्रवास करण्याची वेळ येणार आहे. यंदाही अनेक मार्गावर धावणाऱ्या रेल्वे गाड्यांचे तिकीट काढण्यास महिनाभरापासून प्रवाशांनी सुरुवात केली आहे. यामुळे बहुतांश रेल्वे गाड्यांचे तिकीट बुकिंग फुल्ल होऊन अनेक तिकिटे प्रतीक्षा यादीत आहेत. वाढती मागणी पाहता 'उन्हाळी स्पेशल' गाड्या सोडल्या जातात. जेणेकरून लाखो प्रवाशांना त्याचा लाभ घेता येतो. मे महिन्यातील सर्व आरक्षण आरएसी आणि वेटिंगवर असल्याने ऐनवेळी प्रवास कसा करावा, असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

ऐनवेळी काही जणांचा अचानक बेत ठरत असल्यामुळे नाईलाजास्तव ट्रॅव्हल्सने प्रवास करावा लागत आहे.

या काळात ट्रॅव्हल्सचे दर गगनाला भिडलेले असतात. त्यामुळे प्रवाशांना अधिकचे पैसे मोजावे लागतात. सुट्टीच्या हंगामात ट्रॅव्हल्सकडून करण्यात येणाऱ्या भाववाढीवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

# सामाज सेवकांसह संस्थाना शासनाचे पुरस्कार घोषित

## जिल्ह्यातील ५ व्यक्तींचा सामावेश : १२ मार्चला मुंबईत वितरण

सोलापूर/प्रतिनिधी : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत दरवर्षी समाज कल्याण क्षेत्रामध्ये वैशिष्टयपूर्ण काम करणा-या व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन मिळावे म्हणून शासनाच्या वतीने पात्र व्यक्ती व संस्थांचा यथोचित सन्मान करुन गौरविण्यात येते.

या अनुषंगाने विविध पुरस्काराची घोषणा शुक्रवारी शासनाने केली असून, जिल्ह्यातील ५ व्यक्तींची निवड करण्यात आली असल्याची माहिती समाजकल्याणचे सहायक आयुक्त नागनाथ चौगुले यांनी दिली आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार यांचे नावाने पात्र व्यक्ती व संस्थांचा यथोचित सन्मान करुन गौरविण्यात येते. समाज कल्याणचे सहायक आयुक्त नागनाथ चौगुले यांनी जिल्ह्यातील ५ पुरस्कार घोषित व्यक्तींची भेट घेऊन पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

पुरस्कारचे वितरण मुंबई येथील नॅशनल, सेंटर फॉर परफॉर्मिग आटस, जमशेद भाभा नाट्यगृह, एन सी पी ए मार्ग, नरीमन पाइंट, मुंबई येथे दि. १२ मार्चला सकाळी ११ वाजता राज्याचे मा. मुख्यमंत्री महोदय मा उपमुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते पुरस्कार वितरणचा कार्यक्रम पार पडणार आहे.

यांचा होणार सन्मान:- श्री. विठ्ठल आण्णा पाथरुट (सन-२०१९-२०- डॉ. बाबासाहेब आंबेडकर समान भुषण पुरस्कार), श्री. विलास भिवा लेंगरे (सन-२०१९-२०-डॉ. बाबासाहेब आंबेडकर समान भुषण पुरस्कार) , श्र. प्रवीण दत्तात्रय माने (सन-२०२१-२२-डॉ. बाबासाहेब आंबेडकर समान भुषण पुरस्कार), श्री.सुरेश वसंत कसबे (सन-२०१९-२० साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार),श्री जयद्रथ तुकाराम जाधव (सन-२०२१-२२ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार) यांना सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती समाजकल्याणचे सहायक आयुक्त नागनाथ चौगुले यांनी दिली.

# बार्शी काँग्रेसतर्फे महिलांसाठी नेतृत्व विकास शिबिर



बार्शी/प्रतिनिधीः कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पडताना उंबरा ओलांडून महिलांना समर्थपणे काम करता आले पाहिजे आणि नेतृत्वासह इतर कौशल्य विकसित करता आले पाहिजेत, असे प्रतिपादन काँग्रेसचे जिल्हाउपाध्यक्ष जुगल तिवाडी यांनी केले. बार्शी शहर काँग्रेसच्यावतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून स्मार्ट अ‍ॅकॅडमी भाषण प्रशिक्षण केंद्रात शहराध्यक्ष विजय साळुंखे यांच्या पुढाकाराने काँग्रेस विचारांच्या महिलांसाठी एकदिवसीय 'नेतृत्व विकास प्रशिक्षण शिबिर' घेण्यात आले. या शिबिराच्या समारोपाप्रसंगी तिवाडी बोलत होते. व्यासपीठावर अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष वसीम पठाण, बार्शी शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष विजय साळुंके, प्रशिक्षक सचिन वायकुळे, युवक विधानसभा अध्यक्ष निखिल मस्के आदी उपस्थित होते.

राजकारण, समाजकारणात केलेले काम भाषणातून सांगता आले पाहिजे. नेतृत्व सिद्ध करणाऱ्या अनेक महिलांचा इतिहास या देशाला आहे. बार्शीत महिला सक्षमीकरण चळवळ अशा उपक्रमातून राबविण्याचा हेतू असून या पार्श्वभूमीवरच प्रशिक्षण कार्यशाळा घेण्याचा संकल्प काँग्रेसने सोडला आहे. येणाऱ्या नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस अनेक महिलांना संधी देण्यास तयार आहे, असे तिवाडी म्हणाले. काँग्रेसच्या माध्यमातून बार्शीत महिला सक्षमीकरण तसेच महिला प्रबोधन व त्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम घेत असताना काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या विचारांची फळी तयार करण्यासाठी आम्ही कार्यरत आहोत, असे साळुंखे म्हणाले. अशा प्रशिक्षण व उपक्रमामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढत राहतो, असे पठाण म्हणाले. यावेळी महिला तालुकाध्यक्ष रंजना साळुंखे, रचना साळुंखे, अ‍ॅड. योजना घोलप, नमिता अंधारे, फरीदा बाबुडे, स्वाती थोरात, सुनीता घोणे, महिला शहराध्यक्ष सोनाली जगझाप तसेच प्रशिक्षणार्थी महिला आदींनी मनोगत व्यक्त केले. एकदिवसाच्या या कार्यशाळेत महिलांना प्रेरक प्रसंग कसे सांगावेत तसेच नेतृत्व,संभाषण कोशल्य तसेच यावर प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी अशोक घोलप, महेश जगझाप, विष्णू असवदे, अक्षय चिवटे आदी पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन निखिल मस्के यांनी केले.

# दिमाखात पार पडला 'स्टार प्रवाह परिवार पुरस्कार २०२४'

## रेड कार्पेटवर कलाकारांचा दिसला अनोखा अंदाज





वर्षभर कलाकार आणि प्रेक्षक ज्या पुरस्कार सोहळ्याची आतुरतेने वाट पहात असतात तो स्टार प्रवाह परिवार पुरस्कार २०२४ नुकताच दिमाखात पार पडला. स्टार प्रवाह परिवार पुरस्कारांचं हे तिसरं वर्ष. स्टार प्रवाहच्या कुटुंबातील सर्वच सदस्यांनी या खास सोहळ्याला हजेरी लावली होती. रेड कार्पेटवरचा कलाकारांचा हटके अंदाज लक्ष वेधणारा होता. वेस्टर्न विथ अ इंडियन ट्विस्ट अशी थीम असल्यामुळे कलाकारांच्या एकापेक्षा एक पेहरावाने कार्यक्रमाची शोभा वाढवली. एरव्ही स्टार प्रवाहच्या लोकप्रिय मालिकांमधील या लोकप्रिय कलाकारांना आपण त्यांच्या व्यक्तिरेखेमध्ये भेटत असतो. पण स्टार प्रवाह परिवार पुरस्काराच्या निमित्ताने या सर्व कलाकारांचा अनोखा अंदाज भाव खाऊन गेला. खास बाब म्हणजे पुरस्काराचं औचित्य साधून प्रवाह परिवाराकडून स्टार प्रवाहच्या मराठी दिनदर्शिकेचं अनावरण करण्यात आलं. मराठी परंपरेचं प्रतिक असणारी ही मराठी दिनदर्शिका प्रवाह कुटुंबातील कलाकारांच्या मराठमोळ्या अंदाजाने सजली आहे.

स्टार प्रवाह वाहिनीवर रविवारी १७ मार्चला स्टार प्रवाह परिवार पुरस्कार २०२४ पाहायला मिळणार आहे. स्टार प्रवाहच्या कुटुंबाचा हा कौतुक सोहळा म्हणजे प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची अनोखी पर्वणी असते. यंदा कोणते कलाकार पुरस्कारांवर विजेतेपदाची मोहोर उमटवणार आहेत याची उत्सुकता आहे. खुमासदार सूत्रसंचालन, धमाकेदार परफॉर्मन्सेस आणि विनोदी आतषबाजीने परिपूर्ण असा हा सोहळा पाहायला विसरू नका रविवारी १७ मार्चला संध्याकाळी ७ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८

# महसूल विभागातील पदनामे सन्मान वाढवणारी करावीत : महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील



मुंबई : राज्यातील महसूल विभागातील काही पदांची पदनामे ही ब्रिटिशकालीन असून अशी दनामे बदलून कर्मचाऱ्यांचा सन्मान वाढवणारी पदनामे करावीत, असे निर्देश महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्यांसाठी राज्याचे महसूल मंत्री श्री. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला महसूल विभागाचे अपर सचिव राजेशकुमार, सहसचिव संजय बनकर, सहसचिव श्रीराम यादव, राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे समन्वयक राजू धांडे उपस्थित होते.महसूल मंत्री श्री. विखे पाटील यांनी कर्मचाऱ्यांच्या बहुतांश मागण्यांच्या बाबत सकारात्मक भूमिका घेत विभागीय आयुक्त आणि अधिकार्यांना सूचना देत मागण्यांवर सखोल चर्चा करून मार्गी लागण्याचे निर्देश दिले. महसूल विभागातील विविध पदनामे ही ब्रिटिश कालीन असल्याने सामाजिक प्रतिमा कमी होत चालली आहे. यामुळे आता अशा पदनामांचा दर्जा वाढविण्यासाठी विभागाने प्रयत्न करणे आवश्यक असून उचित पदनामे सुचविण्याचे निर्देश महसूल मंत्री यांनी दिले.

याप्रसंगी प्रामुख्याने महसूल विभागाचा सुधारित आकृतिबंध कर्मचारी कपात न करता लागू करणे, नायब तहसीलदार सरळ भरतीचे प्रमाण निश्र्चित करणे, प्रलंबित वैद्यकीय देयक आणि वेतन वेळेत मिळणे, महसूल सहाय्यक व तलाठी यांच्या ग्रेड पे मध्ये वाढ करणे. अव्वल कारकून आणि तलाठी पदासाठी समान परीक्षा पद्धती लागू करणे, पदोन्नती संदर्भातील प्रलंबित प्रकरणे मार्गी लावणे तसेच महसूल विभागातील अव्वल कारकून यांचे पदनाम महसूल अधिकारी करणे अशा विविध मागण्या बाबत यावेळी चर्चा करण्यात आली. राज्यातील महसूल विभागातील विविध पदांची नावे ब्रिटिश कालीन असून या पदनामांचा हिनतादर्शक शब्दप्रयोग होत असल्याने कर्मचाऱ्यांच्या कामावर आणि मानसिकतेवर परिणाम होतो. यामुळे ही नावे बदलण्याची मागणी महसूल कर्मचारी संघटनांनी केली होती. या मागणीला राज्याचे महसूल मंत्री श्री. विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

# सोमनाथ आवताडे यांच्या हस्ते कोर्टी येथे विविध कामांचे भूमिपूजन

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान दादा आवताडे यांच्या आमदार स्थानिक विकास निधी व विशेष प्रयत्नांतून २५१५, अशा विविध योजनेअंतर्गत निधी मंजूर झालेल्या कोर्टी येथील या कामाचा भूमिपूजन समारंभ कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. सभापती तथा युवक नेते सोमनाथ आवताडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. आ.स्था.वी.मधून ग्रामपंचायत कार्यालय शेजारी रिकाम्या जागेत सभागृह. १) महादेव ननवरे वस्ती ते सुभाष काळे वस्ती रस्ता, २) जांभूळ बेट वस्ती ते पारेकर वस्ती ते उजनी कॅनॉल रस्ता, ३) हसन शेख वस्ती ते शाबुद्दीन शेख वस्ती रस्ता, ४) पंढरपूर करार रोड ते सदाशिव वाघमारे वस्ती रस्ता. अशा विविध ठिकाणी

ग्रामीण भागातील दळणवळण सुविधा सुरळीत व वेगवान होण्यासाठी ग्रामीण वस्त्यांची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. सर्वांगीण विकासाची ही गरज ओळखून आ. आवताडे यांच्या माध्यमातून मतदार संघातील सर्वच रस्ते चकाचक होत असल्याचा मनस्वी आनंद आणि मोठे समाधान जनतेच्या मनात असल्याचे प्रतिपादन मा.सभापती आवताडे यांनी यावेळी व्यक्त केले. सदरप्रसंगी यांच्यासह या भागातील स्थानिक नागरिक व इतर जेष्ठ मंडळी उपस्थित होते.